Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 09 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

देशभरात आज प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जात आहे. ज्यामध्ये भारताच्या विकासात आणि अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या अनिवासी भारतीयांचा सन्मान केला जातो. नऊ जानेवारी १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते, या घटनेचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि जागतिक स्तरावर देशाचा प्रभाव वाढवण्यात प्रवासी भारतीयांचं योगदान यानिमित्त अधोरेखित केलं जातं.

****

एन आय डी एम एस अर्थात नॅशनल आयईडी डेटा मॅनेजमेंट सिस्टिमचा प्रारंभ आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेला मोठी बळकटी मिळणार आहे. स्फोटक सामग्री आणि इम्प्रोव्हाईज्ड एक्सप्लोजिव्ह डिव्हाईस – आयईडी संदर्भातले धोके ओळखणं, प्रतिबंध करणं तसंच बॉम्बस्फोट रोखणं आणि त्यासंबंधित तपास प्रक्रियेत एन आय डी एम एस महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. देशाची आयईडी विरोधी क्षमता वाढवणं आणि अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानलं जात आहे.

दरम्यान, जम्मू-काश्मीरसंदर्भात उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठक शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल पार पडली. दहशतवादमुक्त जम्मू-काश्मीरच्या उद्दिष्टासाठी धडाकेबाज दहशतवादविरोधी मोहिमा राबवण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

रेल्वे मंत्रालय आगामी ५२ आठवड्यांत ५२ महत्त्वपूर्ण सुधारणा लागू करणार असून, यामध्ये सुरक्षावृद्धीवर विशेष भर दिला जाणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यासंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या उपक्रमांतर्गत कार्यक्षमता, प्रशासन आणि सेवा वितरणामध्ये व्यापक सुधारणा करण्यात येणार आहेत. सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत गंभीर रेल्वे अपघातांमध्ये जवळपास ९० टक्के घट करण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत तंत्रज्ञानाचा विस्तार करत सुरक्षा, देखभाल आणि संचालनासाठी एआय आधारित तसंच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला गती दिली जाणार आहे. त्याचबरोबर प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, सेवा वितरण आणि खानपान व्यवस्थेमध्येही व्यापक सुधारणा करण्यात येणार आहेत.

****

भारत निवडणूक आयोगानं येत्या २१ ते २३ जानेवारी दरम्यान, 'लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन-२०२६' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.त्याच्या पूर्व तयारीसाठी निवडणूक आयोगानं काल नवी दिल्ली इथं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक घेतली. निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाहीच्या क्षेत्रातली भारतात होणारी ही आतापर्यंतची सर्वात मोठी जागतिक परिषद असेल.यामध्ये जगभरातल्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे सुमारे १०० प्रतिनिधी सहभागी होतील.

****

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने "पुणेकरांचा अधिकारनामा" हा जाहिरनामा प्रसिद्ध केला. पुणे फर्स्ट या भूमिकेतून प्रत्येक पुणेकराला सुरक्षित, आरोग्यदायी आणि आनंदी जागतिक दर्जाचं शहर अनुभवता यावं, हा आमचा संकल्प असल्याचं, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यावेळी म्हणाले.

****

लातूर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी काल भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. माजी मंत्री तथा निवडणूक प्रमुख संभाजी पाटील निलंगेकर,यांच्या उपस्थिती हा प्रवेश सोहळा झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव पोलिस दलातर्फे नागरिकांना सुरक्षित,त्वरीत तसंच पारदर्शक सेवा मिळावी या हेतुने सुरक्षादूत नावाचं व्हॉटसअप चॅटबॉट कार्यन्वित करण्यात आलं

आहे.यामार्फत विविध आठ सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी 77 96 42 25 25 या व्हॉटसअप क्रमांकावर Hi असा संदेश पाठवल्यास, त्यांना आवश्यक सेवेचा लाभ घेता येणार आहे.

****

गोंदिया जिल्ह्याच्या तिरोडा तालुक्यातल्या खडकी गावात बिबट्याने एका चार वर्षाच्या मुलावर हल्ला करत घरातून उचलून नेलं. आज सकाळी ही घटना घडली. या हल्ल्यात त्या मुलाचा मृत्यू झाला.या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये रोष पाहायला मिळत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

राज्य लोकसेवा आयोगाची गट क संयुक्त पूर्व परीक्षा येत्या रविवारी घेण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यातल्या बारा केंद्रातून दोन हजार ८५० उमेदवार ही परीक्षा देणार आहेत.लातूर जिल्ह्यात १४ उपकेंद्रावर ही परीक्षा होणार असून यासाठी परीक्षा उपकेंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

****

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही. सिंधूनं महिला एकेरीत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात सिंधूनं पहिला गेम २१-११ असा जिंकला असतानाच, तिची प्रतिस्पर्धी जपानच्या अकाने यामागुचीनं दुखापतीमुळे सामन्यातून माघार घेतली. त्यामुळे अवघ्या ११ मिनिटांच्या खेळानंतर सिंधूला विजेता घोषित करण्यात आलं.

****

केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने ११ जानेवारी रोजी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत इयत्ता सहावी ते बारावीचे विद्यार्थी तसंच शिक्षक आणि पालकांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी केलं आहे.

****